**साक्षीदार क्र. ३**

**साक्षीदार अज्ञान असल्यामुळे शपथ न देता साक्ष नोंदविली.**

**नाव : अजय दिपक वानरे,**

**वय : १७ वर्ष १० महिने, धंदा: शिक्षण,**

**रा. बकुपिंपळगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर**

प्रश्न क्र. १- तुझे शिक्षण काय झाले आहे ?

उत्तर- माझे बारावी झाले आहे.

प्रश्न क्र. २- तुला मराठी लिहीता वाचता येते का?

उत्तर- होय.

प्रश्न क्र. ३ - खोटे बोलणे चांगले असते का वाईट?

उत्तर- वाईट.

सदर प्रश्नावरुन साक्षीदाराला विचारलेल्या प्रश्नांची योग्य ती उत्तरे देण्याची समज असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही शपथ न देता खालीलप्रमाणे नोंदविण्यात आली.

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेमार्फत सुरू :**

आमच्या घरामध्ये माझे आई-वडील, आज्जी, माझ्या दोन बहिणी प्रणाली व प्रांजल व मी राहतो. फिर्यादी जयश्री ही माझी आई आहे. माझी आई-वडील शेती करतात व त्यावर आमची उपजिवीका चालते. आम्ही राहण्यास बकुपिंपळगाव येथे शेतामध्ये आहोत. आमच्या घरी जाणे येण्याचा रस्ता संदीप वानरे याच्या शेतातुन आहे. दि. २४/१२/२०२३ रोजी संध्याकाळी चार ते पाच च्या दरम्यान मी व माझी बहिण प्रणाली असे मिळुन पाणी आणण्यासाठी प्रवरासंगम येथे संदीप वानरे याच्या शेतातील रस्त्याने जात होतो. त्यावेळी संदीप वानरे आम्हाला म्हणाला की, तुझ्या बापाचा रोड आहे काय, हा माझा रस्ता आहे. तसेच तो आम्हाला पुन्हा दिसला तर हात पाय तोडुन टाकीन असे म्हणाला. त्यावेळी मी माझ्या आईला आवाज देवुन त्याठिकाणी बोलावुन घेतले व घडलेली घटना सांगितली. त्यावेळी माझी आई आरोपीला समजावुन सांगत होती, त्यावेळी आरोपी माझ्या आई सोबत झटु लागला, माझ्या आईला लोटु लागला. त्यानंतर आम्ही तिघे घरी गेलो. त्यानंतर शेतात काम करणारे माझे वडील घरी आले व आम्ही घटना वडीलांना सांगितली. त्यानंतर आम्ही पोलिस ठाण्यात आलो व फिर्याद दाखल केली. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण,**

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ ॲड श्री. एल. डी. घावटे यांचे मार्फत सुरु-**

मी इयत्ता बारावीमध्ये त्रिमुर्ती या शाळेमध्ये होतो. माझा प्रथम वर्षात दाखला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या रस्त्याने आम्ही जाणे येणे करतो तो रस्ता देवगड-माळेवाडी मार्गे नदीवर येतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या नदीवर ब-याचश्या लोकांनी केलेल्या पाईपलाईन आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्याने बरेचशे लोक मोटार चालु बंद करण्यासाठी ये जा करत असतात. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही जेथे राहतो तेथे थोड्या अंतरावर आजु बाजुला वस्त्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्या लगत ज्या शेती आहेत त्यामध्ये लोक काम करत असतात. घटनास्थळ हे आमच्या घरापासुन शंभर ते दिडशे मीटर अंतरावर आहे. आमचे घर ते प्रवरासंगम हे अंतर चार ते पाच किलोमीटर आहे. आम्ही प्रवरा संगम येथे जार चे पाणी आणण्यासाठी जात होतो, परंतु कोणाकडे जात होतो हे मला सांगता येत नाही, परंतु ती व्यक्ती मुस्लीम होती. आम्ही जारचे पाणी चार ते पाच वर्षापासुन वापरतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही त्याच माणसापासुन जारचे पाणी आणतो. आम्ही जारचे पाणी आणण्यासाठी मोटार सायकलवरुन जात होतो. ती मोटार सायकल माझ्या वडीलांची होती. माझे वडील शेतातील काम आटपुन घटना घडल्यानंतर आम्ही घरी गेल्यावर अर्धा ते एक तासानंतर घरी आले. घटनेच्या दिवशी माझे वडील आमच्या शेतात काम करत होते. आमच्या घरापासुन शेताचे अंतर पन्नास ते शंभर मीटर येवढे आहे. माझे वडील घरी आल्यानंतर आम्ही सांयकाळी साडेपाच ते सहाच्या दरम्यान पोलिस ठाण्यात गेलो. आम्ही पोलिस ठाण्यात मोटार सायकलने गेलो. आम्ही पोलिस ठाण्यात अंदाजे एक ते दिड तास होतो. त्यानंतर आम्ही घरी आलो. हे मी सांगु शकत नाही की, त्यानंतर आम्ही पोलिस स्टेशनला परत कधी आलो. साक्षीदार पुन्हा सांगतो की, आम्ही पोलिस स्टेशनला त्यानंतर आलोच नाहीत. मी ज्यावेळी पाणी आणण्यासाठी गाडीवरुन जात होतो त्यावेळी माझ्याकडे गाडी चालविण्याचा परवाना नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे माझे चुलत चुलत काका आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे आई-वडीलांचे व आरोपीचे रस्त्यावरुन नेहमीच वाद होत असतात. हे म्हणणे खरे आहे की, मी आज रोजी न्यायालयात वडीलांसोबत आलो आहे. माझे व माझ्या वडीलांचे आज तारीख आहे असे बोलणे झाले. माझ्या वडीलांनी तारीख कशाची आहे हे सांगितले नाही. मी जबाब देत असताना पोलिसांना असे सांगितले होते की, त्यावेळी आरोपी माझ्या आई सोबत झटु लागला, माझ्या आईला लोटु लागला. आता मला माझा जबाब दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा मजकुर माझ्या जबाबात नमुद नाही. परंतु सदरचा मजकुर माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे माझ्या लक्षात नाही की, शेतात काम करणारे माझे वडील घरी आले हा मजकुर

मी पोलिसांना सांगितला होता. मी पोलिसांना जबाब देत असताना असे सांगितले होते की, आरोपी आम्हाला म्हणााली की, पुन्हा दिसलास तर तुझे हात पाय तोडु. आता मला माझा जबाब दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये पुन्हा दिसलास तर हात पाय तोडु हा मजकुर नमुद नाही. हे माझ्या लक्षात नाही की, सदरचा मजकुर मी पोलिसांना सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की, दि. २४/१२/२०२३ रोजी चार ते पाच च्या दरम्यान मी व माझी बहिण प्रणाली प्रवरासंगम येथे पाणी आणण्यासाठी संदीप वानरे यांच्या शेतातुन जात होतो, त्यावेळी संदीप वानरे म्हणाला की, तुझ्या बापाचा रस्ता आहे काय, हा माझा रस्ता आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी माझ्या आईला बोलावुन घेतले व घडलेली घटना सांगितली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझी आई समजुन सांगत होती, त्यावेळी आरोपी माझ्या आईला झटु लागला व लोटु लागला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी शेतात काम करणारे माझे वडील घरी आले व आम्ही घडलेली घटना वडीलांना सांगितली हे मी खोटे सांगत आहे. पोलिस स्टेशनला तक्रार देण्यासाठी मी, माझी आई व वडील असे मिळुन गेलो होतो. हे मी सांगु शकत नाही की, आमचे व काकांचे रस्त्यावरुन वाद असल्यामुळे आईच्या आईने काकांविरुध्द खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.08.05 15:27:16 +0530

दिनांक :- ०५/०८/२०२५

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नेवासा